

"Education for Knowledge, Science and Culture."
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

SHRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA'S

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS) 1964

2130, 'E' Ward, Tarabai Park,
Tal. Karveer, Dist. Kolhapur - 416 003.
Affiliated to Shivaji University, Kolhapur (M.S.)

NAAC Reaccredited : "A" (CGPA - 3.24 in 3rd Cycle)
College with Potential Excellence by U.G.C., New Delhi
"Star College" by D.B.T. Govt. of India
ISO 9001 : 2015


0231-2658612 | Fax : 0231-2658840 | Resi.: 0231-2653962 | Website :www.vivekanandcollege.ac.in | E-mail :info@vivekanandcollege.org


| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
|---|---|---|---|---|
| Dr. Bapuji Salunkhe D.Lit. | Hon. Chandrakant Dada Patil Higher and Technical Education Minister, Maharashtra | Prin. Abhaykumar Salunkhe M.A. | Prin. Mrs. Shubhangi Gawade M.Sc., B.Ed. | Dr. R. R. Kumbhar M.Sc.,M.Phil.,Ph.D. |


महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । मंगळवार, ८ ऑक्टोबर २०१९

# नव माध्यमांमध्ये भाषेचा जबाबदारींने वापर हवा

कोल्हापूर टाइम्स टीम

'तंत्रज्ञानामध्ये माध्यम क्रांती घडत असताना स्मार्टफोनमुळे व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम ही दैनंदिनी बनली आहे. माहिती तंत्रज्ञानाची हे देणं असलं तरी त्याचे अनेक फायदे, तोटे आहेत. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व वेब मीडियामुळे समाजाची प्रगती होत असली, तरी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे जतन करताना जनमाध्यमांची भूमिका समजून घेण्याची आवश्यकता आहे' असे मत स्वामी विवेकानंद संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या इंग्रजी, हिंदी व मराठी विभागातर्फे 'भाषा अध्ययनातील जनमाध्यमांची भूमिका' या विषयावर शनिवारी राष्ट्रीय परिषद झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र टाइम्सचे वरिष्ट सहायक संपादक डॉ. विजय चोरमारे यांच्या हस्ते झाले. 'महाराष्ट्र टाइम्स' हे परिषदेचे नॉलेज पार्टनर होते.



अमित गद्दे

'भाषा अध्ययनातील जनमाध्यमाची भूमिका' विषयावरील परिषदेत बोलताना शुभांगी गावडे. यावेळी व्यासपीठावर डॉ. आरिफ महात, प्राचार्य एस. वाय. होनगेकर, डॉ. अतुल पाटील, डॉ. प्रभावती पाटील.

## प्राचार्या शुभांगी गावडे; विवेकानंद कॉलेजमध्ये परिषद

शुभांगी गावडे म्हणाल्या, 'माहिती तंत्रज्ञानामुळे भाषा शिक्षणाला व्यापक मंच मिळाला आहे. आज पारंपरिक व आधुनिक माध्यमांचा समन्वय साधून भाषेचे अध्यापन केले पाहिजे.'

डॉ. अतुल पाटील म्हणाले, 'तंत्रज्ञान आपल्याला नोकरी मिळवून देईल. मात्र, नव्या तंत्रज्ञानाचे पुरेसे प्रशिक्षण नसल्यास मिळालेली नोकरी गमावण्याचा धोका आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जळवून घेताना इंग्रजी भाषेचे समग्र ज्ञान असण्याची आवश्यकता आहे. समग्र ज्ञान नसल्यास चुका होण्याची शक्यता आहे.'

डॉ. चोरमारे म्हणाले, 'भाषा जनमाध्यमाचा आत्मा आहे, परंतु भाषेचा आजच्या अनेक माध्यामांमध्ये अकारण व हिंसकपणे वापर केला जातो आणि सामाजिक स्वास्थ बिघडविले जाते, ही गंभीर बाब आहे.'

पहिल्या सत्रात डॉ. विवेक रणखांबे, डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. नीलेश सबनीस, पत्रकार गुरुबाळ माळी, डॉ. साताप्पा चव्हाण यांनी 'भाषा अध्यापनामध्ये वेब माध्यमांची भूमिका' या विषयावर चर्चा केली. द्वितीय सत्रात डॉ. संभाजी भामवर, डॉ. सुनील देवधर, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. विक्रांत मंडपे यांनी 'भाषा अध्यापनामध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका' या विषयावर चर्चा केली. तिसऱ्या सत्रात डॉ. सतीश घाटगे, श्रीराम मोहिते, उद्धव गोडसे, अनुराधा कदम यांनी 'भाषा अध्यापनामध्ये प्रिंट माध्यमांची भूमिका' या विषयावर चर्चा केली. परिषदेचे संयोजन इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रभावती पाटील, डॉ. आरिफ महात, प्रा. बी. के. गोसावी यांनी केले. परिषद यशस्वी करण्यासाठी कला व वाणिज्य शाखेच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी, प्रा. एस. एम. रुईकर, डॉ. कविता तिवडे, प्रा. डॉ. दीपक तुपे, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. डॉ. सलमा मणेर, प्रा. सुप्रिया पाटील, डॉ. शर्मिला घाटगे, प्रा. माधवी देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

डॉ. प्रभावती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत केले. हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील व प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. मराठी विभागप्रमुख प्रा. भाऊसाहेब गोसावी यांनी आभार मानले.

# The Role of Media in Language Studies

**Newspaper: Maharashtra Times**
**Date: 8th October, 2019**